SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000
FAX : ००९१-०२३१-२६९१५३३ & ००९१-०२३१-२६९२३३३
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३.
Website : www.unishivaji.ac.in e-mail : affiliationt1@unishivaji.ac.in

Estd.1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF-28th Rank

जा.क्र.संलग्नता/टे.१-५/परिपत्रक/ No 1 1 8 — दिनांक :- 6 OCT 2017

# परिपत्रक

**प्रति,**
**मा.प्राचार्य/संचालक,**
**सर्व संलग्न महाविद्यालये**
**व मान्यताप्राप्त संस्था.**

**विषय :- स्थानिक निवड समिती व प्र.प्राचार्य मान्यतेबाबत.**

**महोदय/महोदया,**

सर्व संबंधितांना आदेशानुसार कळविण्यात येते की, प्र.प्राचार्य मान्यता / शिक्षक यांच्या स्थानिक निवड समितीनुसारच्या मान्यतेचे प्रस्ताव महाविद्यालयाकडून विद्यापीठाकडे मान्यतेसाठी पाठविले जातात. परंतू असे निदर्शनास आले आहे की, सदर प्रस्तावामध्ये काही त्रुटी आढळून आल्यामुळे विद्यापीठास नाहक पत्रव्यवहार करावा लागतो. पर्यायाने प्रस्ताव मान्यतेस विलंब होतो. यासाठी महाविद्यालयाने प्रस्ताव पाठविताना प्रस्तावासोबत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असणारी मार्गदर्शक सूची सोबत पाठवित आहे. तेव्हा यापुढे विद्यापीठाकडे प्रस्ताव पाठविताना मार्गदर्शक सूचीमध्ये आहे/नाही असे स्पष्ट नमूद करुन सदरची सूची प्रस्तावासोबत पाठवावी.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
संलग्नता विभाग

सोबत :- वरीलप्रमाणे.

## स्थानिक निवड समिती अहवालासोबत जोडावयाची कागदपत्रे

काही विषयांसाठी रितसर जाहिरात देऊनदेखील पात्र उमेदवार उपलब्ध होत नाहीत अशा वेळी महाविद्यालयाला विद्यार्थी हित लक्षात घेऊन स्थानिक निवड समिती मार्फत शिक्षकांच्या नेमणूका कराव्या लागतात. अशा स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्त्या करताना खालील बाबींची दक्षता घ्यावी.

| अ.क्र | तपशिल | आहे | नाही |
|---|---|---|---|
| १. | स्थानिक स्तरावर प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीचा मुळ अंक | | |
| २. | विद्यापीठाने यापूर्वी दिलेल्या पदमान्यतेची सांक्षांकित प्रत | | |
| ३. | स्थानिक निवड समिती अहवालाचा विद्यापीठ विहित नमुन्यातील तक्ता 'अ' व 'ब' | | |
| ४. | विद्यापीठाकडून अद्ययावत विषय निहाय मंजूर करुन घेण्यात आलेल्या बिंदुनामावली (घोषवारा) तपासून घेतलेल्या(तेरीज) पत्राची प्रत | | |
| ५. | स्थानिक निवड समितीमार्फत शिफारस केलेल्या उमेदवारांची पदवी, पदव्युत्तर पदवी, एम.फील., पीएच.डी.,नेट/सेट, परीक्षांचे गुणतक्ते व प्रमाणपत्र इ.प्रती | | |
| ६. | स्थानिक निवड समिती खालीलप्रमाणे गठित करावी.<br>अ) संस्थेच्या गव्हर्निग बॉडीचे अध्यक्ष<br>ब) महाविद्यालयाचे प्राचार्य/मान्यता प्राप्त शिक्षण संस्थेचे विभागप्रमुख (प्राचार्य अथवा प्रभारी प्राचार्य म्हणून विद्यापीठाची मान्यता आवश्यक आहे. मान्यता नसल्यास प्रथम मान्यता घ्यावी. विना मान्यता बैठकीस उपस्थित राहता येत नाही.)<br>क) महाविद्यालयातील संबंधित विषयातील विभागप्रमुख (विभागप्रमुख नसतील तर जवळच्या महाविद्यालयातील संबंधित विषयातील जेष्ठ विषयतज्ञ घ्यावेत) व पद स्थानिक निवड समितीव्दारे का भरावे लागत आहे याचे कारण स्पष्ट करावे. | | |
| ७. | स्थानिक निवड समितीचा अहवाल विलंबाने पाठविला आहे काय ?<br>प्रस्ताव विलंबाने पाठविला असल्यास या कार्यालयाच्या दि.१२/०७/२००७ च्या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचना क्र.१८ नुसार विलंब दंड आकारण्यास पात्र आहे. | | |

टीप:-

- सत्रारंभाच्या सुरुवातीलाच स्थानिक नेमणूका करुन याबाबतचे प्रस्ताव मान्यतेसाठी सत्वर सादर करावेत.
- स्थानिक निवड समितीचा अहवाल विद्यापीठाकडे निवड समितीच्या बैठकीनंतर दोन दिवसांत मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक आहे. विद्यापीठाची मान्यता मिळाल्यानंतर शिक्षकांच्या नेमणुका कराव्यात व महाविद्यालयातील शिक्षक हजर होताच त्यांचे चेंजिस इन स्टाफ मान्यतेचे प्रस्ताव विहीत शुल्कासह करुन विद्यापीठाकडे त्वरीत पाठवावेत.
- पदमान्यतेनुसार पुर्णवेळ/तासिका तत्वावरील प्रस्ताव मान्यतेसाठी या कार्यालयास पाठवावेत. तसेच पूर्णवेळ पद असताना तासिका तत्वावरील प्रस्ताव पाठवू नयेत. (परिनियम क्र.१९५ नुसार पूर्णवेळ पदासाठी तासिका तत्वावर मान्यता दिली जात नाही.)
- प्राचार्य/संचालक, प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक किंवा तत्सम पदावर स्थानिक निवड समितीमार्फत शिक्षक नेमता येणार नाहीत. केवळ तळांतील पदांसाठीच अपवादात्मक परिस्थितीत अशा नेमणूका कराव्यात.

## प्रभारी प्राचार्य मान्यता अहवालासोबत जोडावयाची कागदपत्रे

महाविद्यालयातील प्राचार्य पद नियमित प्राचार्यांच्या सेवानिवृत्ती, स्वेच्छेनिवृत्ती, धारणाधिकार रजा, सेवामुक्ती,निलंबन, मृत्यु यापैकी कोणत्याही कारणाने रिक्त असल्यास किंवा महाविद्यालयातील प्राचार्य पद भरलेले नसल्यास नियमित प्राचार्य पदी नियुक्ती होईपर्यंत महाविद्यालयातील सेवाजेष्ठ शिक्षकांचा प्रभारी प्राचार्य पदाची नियुक्ती करताना शासन निर्णय क्र.नियुक्ती२०११/प्र.क्र.३४४/११/मशि.५ मंत्रालय विस्तार भवन मुंबई दि.१५ मार्च २०१२ नुसार कार्यवाही करावी. तसेच खालील बाबींची दक्षता घ्यावी.

| अ.क्र | तपशिल | आहे | नाही |
|---|---|---|---|
| १. | नियमित प्राचार्य पद भरणेबाबत केलेल्या कार्यवाहीची पुरावा कागदपत्रे | | |
| २. | प्रभारी प्राचार्य पदासंदर्भातील शिक्षकांचे नांव, शैक्षणिक वर्ष व सत्र नमुद करुन संस्थेचा ठराव | | |
| ३. | शिक्षक मान्यता साक्षांकित प्रत (स्थानिक मार्फत नियुक्ती असल्यास त्या शैक्षणिक वर्षामधील विद्यापीठ मान्यता प्रत) | | |
| ४. | चेंजिस इन स्टाफ मान्यता साक्षांकित प्रत | | |
| ५. | सेवाजेष्ठता यादी शैक्षणिक अर्हतेसह साक्षांकित प्रत | | |
| ६. | प्रभारी प्राचार्य सेवाजेष्ठ नसल्यास त्यांच्या अगोदरच्या जेष्ठ शिक्षकांचे ना-हरकत साक्षांकित प्रमाणपत्र संस्थेच्या स्वाक्षरीसह | | |
| ७. | जर स्थानिक निवड समितीमार्फत शिक्षकांची नेमणूक झाली असल्यास त्या शैक्षणिक वर्षातील शिक्षक मान्यतेची साक्षांकित प्रत | | |
| ८. | नियमित प्राचार्य पद भरणेबाबत विद्यापीठाकडून घेतलेल्या पदमान्यतेची प्रत | | |
| ९. | प्रभारी प्राचार्य प्रस्ताव विलंबाने पाठविला आहे काय ?<br>प्रस्ताव विलंबाने पाठविला असल्यास या कार्यालयाच्या दि.२०/०७/२०११ मधील मागदर्शन सूचना क्र.४ नुसार, प्रती महा रु.१,०००/- प्रमाणे विलंब दंड आकारण्यास पात्र आहे. | | |

टीप:-

- सत्रारंभाच्या सुरवातीलाच प्र.प्राचार्य/प्र.संचालक यांच्या नेमणुका करुन प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवावेत.
- प्रभारी प्राचार्य मान्यता ही एका सत्राकरीता दिली जाईल.
- प्रस्तावासोबत पाठविलेली सर्व कागदपत्रे साक्षांकित करुन पाठवावीत.
- प्र.प्राचार्य यांच्या मान्यतेचे प्रस्ताव संस्था अध्यक्ष/सेक्रेटरी यांच्या स्वाक्षरीने पाठवावेत.